दै. पुण्यनगरी दि. 08/11/2022

# स्थागुशाने ५ दुकाने फोडणाऱ्यांना केले जेरबंद

## तीन चोरटे अटकेत



**नांदेड/प्रतिनिधी**

शहरात ४ नोव्हेंबर रोजी पहाटे एकाच रात्री इतवारा व वजिराबाद परिसरातील ५ दुकाने चोरट्यांनी फोडली होती. सकाळी पालकमंत्री पहिल्यांदाच शहरात आले होते. यांच्या बंदाबस्तात व्यस्त असलेल्या पोलीस दलाची या घटनेमुळे तारांबळ उडाली होती. पण ७२ तासांत स्थागुशाच्या पथकाने या पाच दुकान फोडणाऱ्या तीन चोरट्यांना जेरबंद करुन त्यांच्याकडून चोरी गेलेला माल हस्तगत केला आहे.

शहरातील वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खुशी, इतवारा येथील साईनाथ मेडिकल, नोमुलवार मेडीकर, एस.रहीम ॲन्ड कंपनी, जयगोपाल कृष्णकुमार ट्रेडींग कंपनी ही दुकाने फोडली होती. यानंतर पोलीस दलातर्फे आरोपींना पकडण्यासाठी सुत्र हलविण्यात आली. त्यानंतर आरोपींचे सीसीटीव्ही फुटेज पाहण्यात आले. यात तीन आरोपी चोरी करताना निष्पन्न झाले. यातील तिघांना सोमवारी स्थागुशाने देगलूर, उमरी व नांदेड येथून ताब्यात घेतले. या प्रकरणात आरोपींना खाक्या दाखविल्यावर गुन्हा केल्याची कबुली आरोपींनी दिली. ही कारवाई स्थागुशाचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार सोनवणे, तेलंग, जमादार करले, अफजल पठाण, देवा चव्हाण, मोतीराम पवार, महेश बडगू, रवी बाबर, जसवंतसिंघ यांनी केली.

दै. सत्यप्रभा दि. 08/11/2022

# २२ लाखांच्या चोरीतील तीन आरोपी गजाआड

**नांदेड,दि.७ (प्रतिनिधी)–** शहरातील वजिराबाद आणि इतवारा पोलीस ठाण्याअंतर्गत असलेले पाच दुकाने फोडून २२ लाखांची चोरी केल्याच्या गुन्हयातील दोन आरोपींना पकडून चोरीतील माल जप्त करण्यात अखेर पोलिसांना यश आले आहे.

जिल्ह्यात खा. राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा येणार असल्यामुळे या पदयात्रेच्या बंदोबस्तात व्यस्त असलेल्या पोलिसांसमोर चोरट्यांनी शहरातील पाच दुकाने फोडून तब्बल २२ लाखांची चोरी करुन आव्हान उभे केले होते.वजिराबाद पोलीस ठाण्याअंतर्गत ३ नोव्हेंबरच्या रात्री एक मेडीकल दुकान आणि एक किराणा दुकान फोडून चोरी केली होती. त्याचवेळी चोरट्यांनी इतवारा ठाण्याअंतर्गत असलेली तीन दुकाने फोडली. याप्रकरणी इतवारा तसेच वजिराबाद पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंविनुसार गुन्हे दाखल झाले आहेत. या चोरीचा तपास जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्ष निलेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखच्या अधीपत्याखाली सपोनि पांडुरंग माने, पोउपनि सचिन सोनवणे, दत्तात्रय काळे यांच्या पथकाकडे सोपविण्यात आला होता.

पोलीस पथकाने उपरोक्त चोरीच्या गुन्ह्याचे आरोपी माळटेकडी ते देगलूरनाका जाणाऱ्या रेल्वे ब्रीज असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यावरुन पोलिसांनी सापळा रचून त्या ठिकाणावरुन एकूण तीन गुन्हेगारांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे गुन्ह्याबाबत चौकशी केली असता आरोपी गजनसिंग ठाकूरसिंग बावरी वय १९,रा.हनुमानगल्ली उमरी, मंगलसिंग हिरासिंग बावरी वय १९, रा.शिवाजी चौक परळी ह.मु.क्रांतीनगर देगलूर आणि सोरेनसिंग मंगलसिंग जुन्नी वय २६ रा. लक्ष्मीनगर नांदेड यांनी गुन्ह्याची क़बुली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून दोन मोटारसायकली जप्त केल्या असून पुढील तपास इतवारा पोलीस ठाण्याकडे सोपविण्यात आला आहे.